# राशिभविष्य - मे, २०१४.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. विशेष करून आरोग्यविषयक समस्या त्रस्त करतील, असे वाटते. असह्य मनस्तापामुळेच शारीरिक अनारोग्य होणे संभवते. काही मंडळीनानेत्रविकार , काहीना रक्तदाब, काहीना हृदयविकार , काहीना रक्तविकार, काहीना ताप येणे, थकवा येणे , उष्णताविकार बळावणे अशापैकीआजार त्रस्त करण्याची शक्यता वाटते. त्याशिवाय काही मंडळीना अपप्रचाराचा मनस्ताप होणेही संभवते. तसेच आप्तेष्ट भांडणे, चोरी, फसवणूक अशा कारणांनी द्रव् यहानी होण्याची शक्यताही दिसते. जपा. काही मंडळीना आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण कशा होतील याची चिंता त्रस्त करील. वाम मार्ग धनाच्या लोभामुळे कलंकित व्हाल. जपा. कुमार्गी मित्रांपासून त्रास होणे संभवते. सतत मनाविरुद्ध घटना घडत असल्यामुळे काही मंडळीना गहरे नैराश्य येणे संभवते. वक्री शनीमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे शक्य दिसते. अशा प्रतिकुल परिस्थितीत शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व थोडा दिलासा मिळेल. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल होईल. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धसतत मनस्ताप देणाऱ्या घटनांनी अस्वस्थ करणारा असा सिद्ध होईल, असे वाटते. त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. हृदयविकार, रक्तदाब असे आजार असणारांनी तर सतत मन शांत राखण्याचा प्रयत्न करावा, हे उत्तम. तसेच संयम आणि सहनशीलतेचे आचरण करावे , असे सांगावेसे वाटते. तरच फारसे अनारोग्य होणार नाही. शत्रु राशीतील मंगळामुळे या राशीच्या मंड- ळीना संततीसुखाचे दृष्टीने या महिन्याचा काळ तापदायक असल्याचा अनुभव येणे शक्य दिसते. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे अयोग्य आचरण , कोणाचे अभ्यासाकडे दुर्लक्ष अशापैकी कारणानी वैताग येईल. या राशीच्या ज्या

मंडळीचा परधर्मीयांशीव्यावसायिक संबंध आहे, अशांना अशा संबंधामुळे काळ लाभदायक जाणे संभवते . द्रव पदार्थाचे व्यापारी, मानसिक रोग तज्ञ , औषधविक्रेते यांना काळ लाभदायक होईल. शुक्र - हर्षल युतीमुळे या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना अचानक धनलाभ होणे संभवत‍े धनस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुख समाधान लाभेल व कुटुंबात शुभ घटना घडतील. तसेच आर्थिक प्रगती होणेही संभवते . मात्र मित्रांशी काहीही कारणाने भांडणे होण्याची दाट शक्यता वाटते. जपा. आपल्या लहरी स्वभावाला लगाम घाला. श्रद्धा असेल तर कुलदेवतेची उपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असणार आहे. त्यामुळे त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. चिकित्सक बौद्धिक आणि शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. कलाक्षेत्रातील मंडळीना म‍ात्र महिन्याचा अखेरचा आठवडाच अनुकुल व लाभदायक होईल. गुरू-नेपच्यून शुभ योगामुळे अध्यात्म क्षेत्रात रुची असणारांना उप‍ासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. सुखस्थानी असलेल्या मंगळामुळे या राशीच्या काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; किंवा स्थावर संबंधी वाद त्रस्त करील. तसेच गैरसमजामुळे कौटुंबिक भांडणे होऊन कौटुंबिक सुखात बाध‍ा येणे संभवते. जपा. मुलांपैकी कोणाचे अनारोग्य कोणाचे अयोग्य आचरण , कोणास आलेले नैराश्य व जडत्व अशापैकी कारणांनी अपेक्‍षितसंतति सुखात बाधा येणे संभवते . दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना काळ लाभदायक होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात गुरू-शुक्रातील लाभयोगामुळे विविध मनोनुकुल घटना घडतील. श्रद्धाअसेल तर बावन्न श्लोक‍ी गुरुचरित्राचे नियमितपणे पठण करा.

**(४) कर्क** - या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, पगारवाढ, अधिकारपद असे काही मिळण्याची शक्यता आहे. काही

जणांना नवे मित्र मैत्रिणी मिळण्याची शक्यता दिसते. त्यामुळे सुखसमाधान लाभेल. पण महिन्याच्या शेवटच्या सप्ताहात मात्र् मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता वाटते. तसेच काहीजणाना कौटुंबिक अडचणी, वा अन्य मनस्ताप देणाऱ्या घटना त्रस्त करतील. अध्यात्म , समाजकार्य यांची मनापासून आवड असणारांना काळ अनुकुल व प्रगति - कारक असल्याचा अनुभव येईल. मंगळ ग्रहामुळे धैर्य , हिमत, महत्त्वाकांक्षा वाढेल व हातून काही कर्तबगारी होणे संभवते. सुख स्थानी असलेल्या शनी-राहूमुळे विविध कौटुंबिक समस्या त्रस्त करतील व त्यामुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळणे अशक्य होईल. पाण्यापासून धोका असल्यामुळे जलप्रवास करू नका. या राशीच्या युवकांनी हातचे सोडून नवीन काही करण्याचा विचारही करू नये. नुकसान होणे संभवते. महिन्याचा अखेरचा सप्ताह कला क्षेत्रातील मंडळीना अडचणीचा व मनस्ताप देणारा असल्याचा अनुभव येईल. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकार क होईल. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे किंवा परदेश प्रवासाचे योग येतील. कुलदैवताची उपासना अनुकुल होईल.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही , असेच म्हणावे लागेल. तुलनात्मक दृष्ट्या महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल व मनोनुकुल घटना घडवणारा असा असेल. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत खूप मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. पण महिन्याचा उत्तरार्ध मात्र खूपच अनुकुल व लाभदायक होईलसे दिसते. या राशीच्या युवक-युवतींना उत्तमनोकरी मिळू शकेल वा आवडीचे नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंड विषयक एखादी चिंता त्रस् त कारीलसे दिसते. गुरू-शनी शुभ योगामुळे चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली - सल्लागारी व्यवसाय, अकौणटनसी व्यवसाय, खाण व्यवसाय, कोळसा विक्रेते अशांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. मंगळामुळे चिंता निर्माण होणे संभवते. तसेच शारीरिक उष्णता भडकून डोळ्यात खुपऱ्यावाढणे, मान, घसा , दाढा दुखणे अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात लाभ स्थानीहोत असलेल्या बुध-गुरु युतीमुळे नवे मित्र मिळतील,

सुखसमाधान लाभेल व धनलाभही होऊ शकेल. दाम्पत्य जीवनातील सुखात मात्र विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. तसेच वाहने सावधानतेने व नियंत्रित वेगातच चालवा. अपघात भय आहे. जपा. अष्टम स्थानी असलेल्या शुक्रामुळे काही मंडळीना भूमिलाभ तर काहीना धनलाभ किंवा प्रतिष्ठा असे का ही तरी मिळण्याची शक्यता वाटते. श्रद्धा असेल तर हनुमान उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या** - या राशीच्या मंडळीचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा केवळ सहा महिन्यांचा काळ शिल्लक राहिला आहे. तेवढा काळ मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून घालवू शकलात तर होणारा मानास्ताप खूपच सुसह्य होईल. वादविवाद,, भांडणे टाळा. नम्रतेचे आचरण करा. काळ प्रतिकुल आहे त्यामुळे अपेक्षित असे फारसे काही घडणारच नाही ही गोष्ट सतत ध्यानात ठेवून आचरण केलेत तर मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांचे फारसे दु:ख होणार नाही; व नवीन काही करण्याचा मोहही होणार नाही. तसेच त्यामुळे शारीरिक आरोग्यही बरे राहू शकेल. राहू-शनीमुळे भावंड विषयक एखादी चिंता त्रस्त कारीलसे दिसते. हटटी स्वभावावर नियंत्रण ठेवू शकलात तर शरीरपीडा, दगदग न होता थकावट पण होणार नाही. आर्थिक चिंता व कौटुंबिक कलह असह्य मनस्ताप देण्याची शक्य ता आहे. जपा. काल्पनिक चिंता करू नका. या राशीच्या ज्या मंडळीचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. दाम्पत्य जीवनात वाद, मतभेद टाळण्याचा प्रयत्न करा. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन, साहित्यनिर्मिती असे व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना व हनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(७ ) तुळा -** या राशीच्या मंड ळीचे मन सध्या अत्यंत भावनाशील व चंचल झाले असण्याची दाट शक्यता वाटते. शास्त्रीसंशोधन कार्यास हर्षल ग्रह अनुकुल असला तरी संशोधन कार्यात यश येण्यासाठी अति विचार करू नका. डोकेदुखी किंवा मेंदूचे आजार होण्याची शक्यता असते. जपा. काळ

शनी ग्रहाच्या साडेसातीचा आहे. त्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडणे संभवते. तसे घडले तर गहरे नैराश्य येणे शक्य असते. जपा. सहनशील व्हा आणि मन व बुद्धीवर ताबा ठेवून प्रतिकुल काळ व्यतीत करा. अध्यात्माची मनापासून आवड असेल तर आध्यात्मिक साधनेत मन रमवा. गुरु-नेपच्यून शुभ योगामुळे उपासनेद्वारे मानसिक शांती मिळवणे शक्य होईल. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे जीवनसाथीचे व स्वत:चे अनारोग्य, दोघांतील मतभेद, वाद यांमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ताप येणे, अपचन होणे, पोटाचे विकार बळावणे, अशापैकी आजार होण्याची शक्यता वाटते. जपा. गुरु - शनि शुभ योगामुळे चिकित्सक व्यवसाय, वकिली, सल्लागारी, हिशेब अशी कार्यक्षेत्रे असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या शत्रू राशीतील मंगळामुळे गैर समजुती, मानहानी, जुनी दबलेली प्रकरणे पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असहय त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. श्रद् धा असेल तर हनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

(८) **वृश्चिक** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होणार आहे. त्यामुळे त्यांनी जे काय साधावयाचे ते पूर्वार्धात च साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. नोकरदार मंडळीना त्यांच्या कामातील कौशल्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात पगारवाढ, बढती, अधिकारपद असे काही मिळण्याची शक्यता दिसते. तसेच महिन्याच्या पूर्वार्धातच कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. महिन्या च्या उत्तरार्धात गैरसमज, संशय, घरगुतीबाबत समस्या अशापैकी कारणानी गृहसौख्यात बाधा येणे शक्य दिसते. अशा परिस्थितीत जोपर्यंत शुक्र ग्रह पंचम स्थानी मीन राशीत आहे तोपर्यंत कौटुंबिक सुखसमाधान लाभण्याची शक्यता वाटते. तसेच कला क्षेत्रातील मंडळीनाही महिन्याचे पहिले तीन आठवडेच अनुकुल व लाभदायक होतील. या राशीच्या ज्या मंडळीच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग आहेत अशापैकी काहीना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहीना वारसा हक्काने धनलाभ होणेही शक्य आहे. या राशीच्या लाभ स्थानी असलेल्या

मंगळामुळे मैत्रीत वितुष्ट येणे संभवते. जपा. पण काही भाग्यवंताना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. वाहने सावधानतेने चालवा. आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वक करा. राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे शक्य आहे; पण हाच राहू काही भाग्यवान मंडळीना परदेशगमनाची संधी देऊ शकेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु** - सध्या या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या पूर्वार्धात संयम आणि सहनशीलतेने आचरण करणेच सुखाचे होईल. कारण या राशीच्या लाभस्थानी असलेल्या शनि-राहूमुळे संततीसंबंधी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व प्रगतिकारक होणार आहे. अध्यात्माची मनापासून आवड असेल तर उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल आणि शिवाय मनही स्वस्थ राहील. नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. प्रियजनांपासून दूरत्व घडणे संभवते. त्यामुळे मन अस्वस्थ राहील. हर्षलमुळे स्वभाव तक्रारखोर राहील व त्यामुळे गृहसौख्य मिळणेही अशक्य होईल. जपा. पण शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व थोडा दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत परिस्थिती अनुकुल होईल , विरोधक पराभूत होतील, आणि सुखसमाधान लाभेल. यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना , औषधविक्रेत्यांना चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनिकुल व लाभदायक होईल. सप्तम स्थानी असलेल्या गुरूमुळे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. विवाहेच्छूचे विवाह जमतील. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात वैवाहिक जीवनात थोडी बाधा येणे संभवते. जपा. नोकरीत वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. गुरु दत्तात्रेयाची उपासना करा. बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे नियमाने पठण करा.

**(१०) मकर -** सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांमुळे मन अस्वस्थ राहीलसे दिसते. त्यातून शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. नोकरीत वरिष्ठांचा त्रास होणे संभवते. काळ प्रतिकुल आहे ही गोष्ट ध्यानात घेऊन मनावर संयम ठेवून व सहनशील बनून

नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. कोणाच्या आर्थिक जबाबदाऱ्या स्वीकारू नका. सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करा. उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना , शास्त्रीय संशोधन कार्यात मग्न असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या काही भाग्यवंताना परदेशगमनाचे योगही संभवतात. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री गाहाकाकडूनच अधिक अर्थलाभ होईल. शुक्राच्या अनुकुलतेने काहीना धनलाभ, काहीना मानाचे स्था न तर काहीना भूमिलाभ होण्याची दाट शक्यता आहे. महिन्याच्या ्पूर्वार्धात मतभेद, वाद यांमुळे कौटुंबिक सुख समाधान मिळण्य ाचीशक्यता कमी आहे. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या चतुर्थ स्थानी शुक्रग्रह येईल तेव्हा मनोनुकुल घटना घडतील व बरे वाटेल. शेती व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात आरोग्य सुधारेल व मनोनुकुल घटना घडतील. शक्यतो प्रवास करू नका. मनस्ताप होणे संभवते. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय , वकिली सल्लागारी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर हनुमान उपासना अनुकुल होईल. श्रद्धेने हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, सुखसमाधान देणारा व लाभदायक असा असेल असे वाटते. बुध - शुक्राच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुख, कौटुंबिक प्रगती , गृहसौख्य लाभेल. नेपच्यूनमुळे मन हळवे झाले असेल तर क्षुल्लक कारणानेही नैराश्य , उदासीनता येणे संभवते. अशा परिस्थितीत मन व बुद्धी स्थिर व काबूत राखणे जमले पाहिजे. तसेच जिभेला लगाम घालून आचरण करणे जमले पाहिजे. तरच दाम्पत्य जीवनातील समाधानही लाभेल. या राशीच्या शासकीय, निम शासकीय नोकरदार मंडळीना पगारवाढ, बढती, मानाचे स्थान , वरिष्ठाकडून प्रशंसा , काहींना धनलाभ तर असे काही मिळण्याची शक्यता दिसते. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती साधणे सहज शक्य होईल. प्रेमसंबंध , स्नेहसंबंध दृढ होतील. मात्र शारीरिक मानसिक आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. उष्णताविकारांचा त्र ासहोणे संभवते. काहीना मूळव्याधीचा त्रास तर

काहीना शारीरिक मानसिक कष्ट सहन करावे लागण्याची शक्यता आहे. जपा. अपघात भय असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. वाहने नियंत्रित वेगाने चालवा. जलभय , विषभय आहे. जपा. महिन्याच्या उत्तर ार्धात काहीही कारणाने गृहसौख्यात बाधा येऊ शकेल अध्यात्म साधनेसाठी काळ अनुकुल आहे. त्यामुळे मन: शांतीसाठी गुरु दत्तात्रेयाची व श्रीहनमानाची उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीचा स्वभाव सध्या अस्थिर, चंचल व लहरी असा झाला असावा, असे वाटते. तसेच मन काल्पनिक चिंता करणारे झाले असेल तर अकारण नैराश्य येत असणेही शक्य दिसते. वास्तवात आर्थिक चिंता असेल किंवा प्रिय जनांशी वाद झाले तरच नैराश्य येणे स्वाभाविक आहे. पण शुक्र ग्रहाच्या अनुकूलतेमुळे कौटुंबिक सुखात फारसा त्रास होणार नाही, असे वाटते. पण दाम्पत्य जीवनात मात्र जीवनसाथीचे अनारोग्य, दोघातील वाद, मतभेद अशा कारणांनी सुखसमाधान लाभण्याची शक्यता दिसत नाही. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धाच अनुकुल व लाभदायक होईल. पण वाम मार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात गुरू-बुध या ग्रहांच्या अनुकुलतेने गृहसौख्य लाभेल, मित्रसुख मिळेल. काहीना स्थावर खरेदी-विक्रीचे योग योग येणेही संभवते . पण नातेवाईक मंडळीकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. वात गुणधर्माचे प्राबल्य असेल तर दमा, फुफ ुसाचे आजार , श्वासविकार अशापैकी आजार त्रस्त करतील . जपा. पुढील महिन्यात गुरु ग्रह कर्क राशीस जाईल तेव्हा परिस्थितीत सुधारणा होईल. सध्या दररोज श्रद्धेने नियमितपणे बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे व हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा .

=====ooooo=====